महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४०००१
e-mail:- msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in

पत्र क्रं नाविमं / पउमा / Q-1
नागपूर, दिनांक 4/ 03 / 2023

प्रति,
मा.संचालक ,
माहीती प्रसिध्दी व
जनसंपर्क कार्यालय,
नागपूर विभाग, नागपूर.

विषयः– उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ 12 वी )परीक्षा फेब्रु / मार्च 2023 "इंग्रजी" विषयाच्या प्रश्नपत्रिकेतील त्रृटीबाबत.

संदर्भ :–राज्य मंडळ, पुणे यांचे पत्र क.रा.मं. / परीक्षा–6 / 1078 दिनांक – 04 / 03 / 2023

महोद्‌य,

फेब्रु / मार्च 2023 च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.12वी) परीक्षा "इंग्रजी" विषयाच्या प्रश्नपत्रिकेतील त्रृटीबाबातचे प्रकटन सोबत जोडले आहे. सदर प्रकटनास आपण आपल्या कार्यकक्षेतील वृत्तपत्र, वृत्तवाहिन्या, आकाशवाणी व दूरदर्शन केंद्रांनी बातम्यांचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी, ही विनंती.

सोबतः– राज्य मंडळ,पुणे यांचे प्रकटन.

(आपला विश्वासू,)

(चिंतामण वंजारी)
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

प्रतिलिपीः–

1)सचिव,राज्य मंडळ, पुणे यांना संदर्भिय पत्राचे अनुषंगाने माहितीस्तव समादराने अग्रेषित.
2)शिक्षण उपसंचालक नागपूर, विभाग नागपूर यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव समादराने अग्रेषित.
3)शिक्षणाधिकारी (माध्य). जिल्हा परिषद,(भंडारा,चंद्रपूर,नागपूर,वर्धा,गडचिरोली,गोंदिया) यांना कळविण्यात येते की, आपले अधिनस्त सर्व संबंधित उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाला कळविण्याचे कार्यवाहीस्तव.
4)मा. संपादक, दैनिकभास्कर, सकाळ, महाराष्ट्रटाईम्स, लोकमत, देशोन्नती, लोकसत्ता, लोकमतसमाचार, तरूण भारत, नवभारत यांना विनंती करण्यात येते आपले वृत्तपत्रातून प्रकटनास विनामूल्य प्रसिध्दी देण्याची कार्यवाही करून सहकार्य करावे ही विनंती.

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

## प्र क ट न

विषय-- फेब्रुवारी--मार्च २०२३ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेतील "इंग्रजी" विषयाच्या प्रश्नपत्रिकेतील त्रुटीबाबत...

---

फेब्रुवारी--मार्च २०२३ मध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा दि. २१ फेब्रुवारी २०२३ पासून आयोजित करण्यात आलेली आहे.

दि. २१ फेब्रुवारी, २०२३ रोजी "इंग्रजी" विषयाची परीक्षा झाली आहे. प्रचलित पध्दतीप्रमाणे इंग्रजी विषयाची संयुक्त सभा विषय तज्ज्ञ व सर्व विभागीय मंडळाचे प्रमुख नियामक यांच्या समवेत दि. ०३.०३.२०२३ रोजी आयोजित करण्यात आली. सदर इंग्रजी प्रश्नपत्रिकेमध्ये त्रुटी/चुका आढळून आल्या असल्याचे इंग्रजी विषयाच्या संयुक्त सभेच्या अहवालावरून निदर्शनास येते. सदर अहवालानुसार त्रुटी असलेल्या प्रश्नांचे गुण विद्यार्थ्यांना पुढील परिस्थितीमध्ये देण्यात येतील.

१. Poetry Section-2 / Poetry / Section-2 असा केवळ उत्तरपत्रिकेमध्ये उल्लेख केला असल्यास,

२. Poetry Section-2 मधील अन्य कोणतेही प्रश्न विद्यार्थ्यांनी सोडविण्याचा प्रयत्न केला असल्यास,

३. त्रुटी असलेल्या प्रश्नांचे क्रमांक (A-3, A-4, A-5) असे केवळ उत्तरपत्रिकेत नमूद केले असल्यास,

उपरोक्त तीन पैकी कोणत्याही एका प्रकारचे लेखन उत्तरपत्रिकेत विद्यार्थ्याने केले असल्यास, विद्यार्थ्यास प्रत्येक प्रश्नाचे ०२ याप्रमाणे एकूण ०६ (सहा) गुण देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

दिनांक : ०८.०३.२०२३

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे ४.